# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २७३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २६/०५/२०१८

## १) अश्लिल शब्दात शिवीगाळ करून मारण्या–पिटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद:–

दिनांक २४/०५/२०१८ चे २३.५० वाजता दरम्यान फिर्यादी ही तिचे घररासमोर उभी असतांना यातील आरोपीने फिर्यादीस दि. २३/५/२०१८ ला झालेला भांडण मारपीट मध्ये आरोपीच्या पतीच्या नावाने 'पोलीस स्टेशनला रिपोर्ट का दिली' तसेच आपले घरसमोर बसते आणी माझ्या गोष्टी करते असे म्हणुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करून मारण्या–पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २९४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

## २) मोटार सायकलची चोरी:–

दिनांक २४/०५/२०१८ चे २१.५० वाजता दरम्यान यातील फिर्यादी रूपचंद दिलीप शेंडे वय २४ वर्ष रा. कस्तुरबागांधी वार्ड भंडारा हे त्याची मोटार सायकल हिरो होंडा क्र. एमएच ३६/यु ७५४८ कि. ३०,०००/रु. ने कचरा फेकण्यास बसस्टॉप जवळील नाल्यावर गाडी ऊभी करून गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

## ३) संगनमत करून विटाने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद:–

दिनांक २४/०५/२०१८ चे २३.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची जखमी आई सौ. गिताबाई नंदकिशोर मंदुरकर वय ५२ वर्ष हीचे सोबत दि. २३/०५/२०१८ ला सरकारी पाण्याचे नळावर पाणी भरण्याच्या कारणावरून वाद झाला व त्या कारणावरून त्या गोष्टीचा राग आल्याने दि. २४/०५/२०१८ चे २३.३० वाजता दरम्यान जखमी ही घरी हजर असतांनी यातील आरोपीतांनी संगनमत करून त्याचे घरी जावुन विटाने जखमीचे डोक्यावर मारून गंभिर जखमी केले व तिला घराबाहेर काढले असे जखमीने फिर्यादीला सांगीतल्याने फिर्यादी सौ. भाग्यश्री विलास क्षिरसागर वय २२ वर्ष रा. इंदीरा गांधी वार्ड कुंभार टोली भंडारा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२६,३२३,४५२,५०४, १४३,१४७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. बोरकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

## ४) विट फेकुन मारल्याने डोक्याला मार लागुन दुखापत झाल्याने गुन्हा नोंद:–

दिनांक २५/०५/२०१८ चे ०९.०० वाजता दरम्यान यातील आरोपी क्र १ हा फिर्यादीचे कुपाचे खांब मोडीत असतांना फिर्यादीने त्यास हटकले असता आरोपी क्र. २ ने फिर्यादीस 'तुझ्या या जागेवर कोणताही अधीकार नाही' असे बोलुन दोघांनीही विट फेकुन मारल्याने फिर्यादीचे डोक्याला जखम झाली त्यानंतर आरोपी क्र. ३ हा माझ्या आई वडीलांनी तुला काहीच मारले नाही मी असतो तर जिवानीशी ठार मारलो असतो, अशी धमकी दिल्याने फिर्यादी जयपाल मारोती खोब्रागडे वय ६३ वर्ष रा. कन्हाळगाव यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. राहांगडाले पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

## ५) निष्काळजीपणे ट्रक चालवुन स्कुटीला धडक देवुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद:–

दिनांक २५/०५/२०१८ चे १३.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीची स्कुटी क्र. एमएच ३६ वाय ६२८२ ला धडक मारून नुकसान केल्याने फिर्यादी संजय मुरारी भांबोरे वय ५१ वर्ष रा. पहेला यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९ भादवी. १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सतदेवे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

## ६) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद:–

दिनांक १७/०५/२०१८ चे १०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही घरी कुनालाही न सांगता घरून निघुन गेली तीला कोणीतरी अज्ञात ईसमाने पळवुन नेले असावे असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोसरे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**७) औषधोपचारा दरम्यान ईसमाचा मृत्यु . :–**

दिनांक २५/०५/२०१८ चे १७.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचा मृतक भाऊ यास दि. २५/५/२०१८ ला ताप आल्याने त्यास औषधोपचारा करीता सामान्य रूग्नालय भंडारा येथे आक्समीक विभागात भरती केले असता, उपचारा दरम्यान मरण पावल्याने फिर्यादी सुजित मारोती मेश्राम वय ३० वर्ष रा. सुरेवाडा यांचे तोंडी वा डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सेलोकर पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**८) अवैध हातभट्टी दारु/ जुगार अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक २५/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन तुमसर, व गोबरवाही येथे हातभट्टी, दारू/ जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३० लिटर हातभट्टी + ९३० किलो सडवा मोहा + सहीत्य किंमती १६,९००/–रु. तसेच जुगारातुन किंमती २१५/–रु. असा एकुण किंमती /–रु. १७,११५/रु. चा माल जप्त करण्यात आला.

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २५/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनाकरीता– १० ईतर वाहनांवरती – ९४ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.
**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.